सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर

E-mail :-chandrapur.rdc@gmail.com फोन नं. 07172 – 251597

पत्रक्र. कावि/आ.व्य.शा./को.के.सें/2021/ 16 दिनांक - 18 जानेवारी, 2022

वाचा:-1. साथरोग अधिनियम 1897.

2. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, कलम 33, 34, 51, 56, 57, 58, 63 व 65.

SVAMC
IW No. 55
Date. 20/01/2022

## आदेश

जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात कोविड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात कोविड-19 आजाराने बाधित रूग्णांच्या संख्येत होत असलेली वाढ लक्षात घेता कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांतर्गत कोविड-19 आजाराने बाधित वा सौम्य लक्षणे असलेल्या रूग्णांना डेडिकेटेड कोविड केअर सेंटरमध्ये ठेवता यावे याकरीता खालील तक्त्यात नमुद इमारती दि. 20/01/2022 पासून पुढील आदेशापर्यंत अधिग्रहित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | इमारतीचे नाव | तालुका |
|---|---|---|
| 1. | महात्मा गांधी महाविद्यालय, सावली | सावली |
| 2. | मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, सिंदेवाही | सिंदेवाही |
| 3. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतीगृह, ब्रम्हपूरी | ब्रम्हपूरी |
| 4. | शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जिवती | जिवती |
| 5. | शासकिय आदिवासी मुलींचे वसतीगृह, गोंडपिपरी | गोंडपिपरी |
| 6. | स्वर्गीय भाऊराव चटप आश्रमशाळा, कोरपना | कोरपना |
| 7. | आदर्श हिंदी प्राथमिक विद्यामंदीर, गडचांदुर | गडचांदुर |
| 8. | श्रीमती विमला देवी आयुर्वेद महाविद्यालय, वांढरे चंद्रपूर | चंद्रपूर |

सदर इमारती ताबा संबंधित तालुक्यातील मुख्याधिकारी यांनी घ्यावा व अधिग्रहित इमारतीमध्ये कोविड केअर सेंटरची स्थापना करावे. डेडिकेटेड कोविड केअर सेंटरमध्ये खालील सुविधा पुरविण्यात याव्यात.

1. डेडिकेटेड कोविड केअर सेंटरमध्ये सि.सि.टिव्ही लावण्यात यावे.
2. रूग्णांना जेवण, चहा, नाश्ता देण्यात यावा.
3. रूग्णांसाठी क्षमतेनुसार खाटांची व गादी-चादरची व्यवस्था करण्यात यावी. रूग्णांनी वापरलेले चादर नियमितपणे धुण्यात यावे.
4. रूग्णांकरीता पिण्याचे, वापरण्याचे व आंघोळीकरीता गरम पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.
5. अधिग्रहित इमारतीमध्ये आवश्यकतेनुसार इलेक्ट्रीक व प्लंबिंगची कामे करण्यात यावी.
6. अधिग्रहित इमारतीमध्ये 25 टक्के खाटांकरीता $O_2$ Concentrator लावण्यासाठी प्लग सॉकेट ची व्यवस्था करण्यात यावी.
7. अधिग्रहित इमारतीत साफसफाई कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी व आवश्यक मनुष्यबळ पुरवावे.

सदर डेडिकेटेड कोविड केअर सेंटर तालुका आरोग्य अधिकारी यांनी कार्यान्वित करून सनियंत्रण करावे.

स्वा/—

(अजय गुल्हाने, भा.प्र.से.)

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर

प्रतिलिपी: माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषित

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
3. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,चंद्रपूर/चिमूर यांनी आदेशात नमुद वसतीगृहामधील विद्यार्थी/विद्यार्थीनींची पर्यायी व्यवस्था करण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करावी.
4. जिल्हा शल्य चिकीत्सक, चंद्रपूर
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. चंद्रपूर
6. उपविभागीय अधिकारी (सर्व) यांनी Incident Commander या नात्याने याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करावी व याबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा.
7. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, चंद्रपूर
8. तहसिलदार (सर्व)
9. मुख्याधिकारी (सर्व)
10. तालुका आरोग्य अधिकारी (सर्व)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**